पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 14 ]

दिनांक : 08/3/2017 वेळ : दुपारी 12.०० वा.

---------------------------------------------------------------------------------- ------- ------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मार्च 2017 ची मासिक सभा बुधवार दिनांक 08/3/2017 रोजी दु. 12.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील “राजमाता जिजाऊ सभागृह” येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. पांढरकर निलेश शंकरराव | सभापती |
| 2. | मा. भारती फरांदे | सदस्या |
| 3. | मा. जावेद रमजान शेख | सदस्य |
| 4. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 5. | मा. नंदा विकास ताकवणे | सदस्या |
| 6. | मा. मोरेश्वर महादू भोंडवे | सदस्य |
| 7. | मा. प्रसाद शेट्टी | सदस्य |
| 8. | मा. बेबीनंदा राम भोंडवे | स्वीकृत सदस्या |

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे- मा. क्षेत्रीय अधिकारी, श्रीम.रेखा गाडेकर– प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. महादेव शिंदे–सहा. आरोग्याधिकारी, श्री. पी.जे.कदम – लेखाधिकारी, श्रीम बाबर एल.एस. श्रीम मोमीन झेड.वाय., श्री काळे एस.पी. – उपअभियंता, श्री वैद्य एस.आर., श्री लवटे एस.एन., श्री बंडगर एस.बी. – कनिष्ठ अभियंता इ. उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

त्यानंतर मागील सभेचा सभावृत्तांत [ दि. 8/2/2017 कार्यपत्रिका क्रमांक 13 ] वाचून कायम करणेत आला.

ठराव क्रमांकः- १०२ विषय क्रमांकः- १
दिनांकः- ८/३/२०१७ विभागः-आरोग्य
सुचकः-मा. राजू मिसाळ अनुमोदकः- मा. प्रसाद शेट्टी

संदर्भः- मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक अक्षेका/आ2अ/कावि/320/2017
दि. 4/3/2017

केंद्रशासनाने घोषित केलेनुसार स्वच्छ भारत मिशन [ नागरी ] अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. 10, 18, 25 व 27 हगणदारी मुक्त जाहीर करणेस मा. प्रभाग समितीने दि. 8/2/2017 रोजीचे प्रभाग समिती सभेत मान्यता दिली आहे. याबाबत स्थानिक वृत्तपत्रात [ दै. पुढारी, दै. पुणे जिल्हा सांज समाचार, दै. कातिब, सा. पिंपरी चिंचवड पवनेचा प्रवाह, सा. काय चाललंय ?] जाहिर प्रकटन प्रसिध्द करुन दि. 28/2/2017 पर्यंत सदर भागातील नागरिकांच्या सुचना/हरकती मागविणेत आल्या होत्या. सदर कालावधीत कोणत्याही सुचना/हरकती प्राप्त झालेल्या नाहीत. यास्तव प्रभाग क्रमांक 10, 18, 25 व 27 हगणदारी मुक्त जाहीर करणेबाबत दि. 8/2/2017 रोजीचे मा. प्रभाग समितीने पारीत केलेले ठराव अंतिम/कायम करणेस तसेच सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

त्यानंतर मा. सभापती श्री. निलेश पांढरकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(निलेश शंकरराव पांढरकर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /11/कावि/1086/2017
दि. 10/03/2017

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी – ४४

प्रति,
सर्व संबंधित विभाग